**नि.दि.दा.क्र. ३६/२०१२**

**नि. १७७ व ३०१ लगत**

**<u>उर्वरीत उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ५ तर्फे ॲड टी.आर.पवार यांच्यातर्फे शपथेवर सुरु–</u>**

सर्व्हे नं.९७०/1 आणि ९७1/1 या माझ्या माहितीच्या मिळकती आहेत. सदर मिळकती आमच्याकडे खरेदीने आल्या. हे मला आठवत नाही की त्या मिळकती कोणाकडून व किती साली खरेदी केल्या. त्याचा कागदोपत्री पुरावा मी दाव्यात दाखल केलेला नाही. सर्व्हे नं.८४०/३ ही मिळकत तात्याबा माने यांच्या मुळ मालकीची होती. सदर मिळकत सातशे रुपयांना खरेदी केली. ती किती साली खरेदी केली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की त्याबद्दलचा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. सर्व्हे नं.१११०/१अ ही मिळकत आमच्या आजोबांची होती. सदर मिळकत आजोबांनी उत्तम नथुजी यास विकली व त्याच्याकडून गौतम माने यांनी खरेदी केली. हे मला सांगता येणार नाही की ती मिळकत किती रुपयांना व किती साली खरेदी केली. हे म्हणणे खरे आहे की त्याचा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की सर्व्हे नं.११५३/२क या मिळकतीस विठ्ठल तुकाराम याचे नाव लागले. ती मिळकत मुळची तुकाराम यांची होती. हे म्हणणे खरे आहे की तुकाराम यांच्याकडून विठ्ठल याने खरेदीपत्र केले नाही. सदर मिळकत किती साली, कुणाकडून व किती रुपयांना खरेदी केली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की त्याचा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. सर्व्हे नं.१०८८/४अ ही मिळकत माझ्या माहितीची आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर मिळकत दिनांक २६/०७/१९३५ रोजी मनोहर गोविंद लोखंडे यांना खरेदी दिली. हे म्हणणे खरे नाही की त्याचे खरेदीपत्र खंडू व विठ्ठल यांनी करुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकत एकटया खंडूने खरेदी दिली हे दाखवण्याकरीता मी खरेदीपत्र दाखल केलेले नाही. ते खरेदीपत्र मी हजर करायला तयार आहे. हे मला सांगता येणार नाही की गावातील आमचे जुने घर ३६ खणाचे आहे. हे म्हणणे खरे आहे की उत्तरेकडील ९ खण घर हे प्रतिवादी क्र.३ च्या ताब्यात आहे. हे मला माहिती नाही की सदर घराला नगरपालीकेकडे प्रतिवादी क्र.३ च्या नावाची नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की मारुती खंडेराव याच्या घराच्या दक्षिणेला ९ खणाचे बैठे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर बैठे घराच्या दक्षिणेस ९ खणाचे माडीचे घर आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की ६ खणाचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की बैठया घरामध्ये दशरथ राहतो. हे म्हणणे खरे आहे की नगरपालिकेला बैठया घराची नोंद दशरथच्या नावाने आहे. हे म्हणणे खरे आहे की माडीच्या घराला नगरपालिकेकडे गौतमच्या नावाची नोंद आहे. प्रतिवादी क्र.२ च्या ताब्यात असलेल्या घराची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र.२ च्या घराच्या पूर्वेला पूर्वी जुने घर होते व त्या घराला गौतमच्या नावाची नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की सदाशिवच्या ताब्यातील घराला नगरपालिकेकडे त्याच्या नावाची नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की सदाशिवच्या घराच्या पूर्वेकडील घर आम्ही पाडले व त्या ठिकाणी आम्ही गाडया

लावण्याकरीता शेड बांधले. हे म्हणणे खरे आहे की ज्या ज्या लोकांच्या नगरपालीकेकडे घराच्या नोंदी आहेत ते ते लोक घरफळा भरत आलेले आहेत. आमच्या म्हाडीच्या घराच्या दक्षिण बाजूला प्रतिवादी क्र.६ याची जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की त्या जागेबद्दल आम्ही रे.दि.मु.नं.१२१/१९८३ हा दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की आमचा दावा काढून टाकला होता. हे म्हणणे खरे आहे की त्या दाव्यावरचे अपील १३०/१९९९ हे देखील कोर्टाने काढून टाकले. माझी जन्मतारीख १३/११/१९६७ आहे. हे मला माहिती नाही की त्यावेळी आमच्याकडे सावळया व सुंदर असे दोन बैल, एक म्हैस होती. हे म्हणणे खरे आहे की गावठाणात आमची मोकळी जागा होती. हे म्हणणे खरे नाही की सदर जागेतील दक्षिणेकडील निम्मी जागा दशरथ व उत्तरेकडील निम्मी जागा गौतम याच्या ताब्यात होती. माझ्या म्हणण्याप्रमाणे त्या ठिकाणी ६ खणाची घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की सन १९७२ मध्ये मठामध्ये पत्र्याची ८ पाने होती. हे म्हणणे खरे नाही की त्यातील चार पाने दशरथला व चार पाने गौतमला असे वाटप झाले होते. हे म्हणणे खरे नाही की सन १९७२ साली सजन्या बैल दशरथला व सुंदर बैल आणि म्हैस गौतमला दिले होते. हे म्हणणे खरे नाही की विपटयाचा माळ मध्ये दशरथ व गौतम यांची वहिवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की विपटयाच्या माळातील उत्तरेकडील भाग दशरथच्या व दक्षिणेकडील भाग आमच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की हजरवाडीमध्ये घरची जमीन व घेतलेली जमीन अशा दोन जमीनी आहेत. हे म्हणणे खरे नाही की घरच्या जमीनीमध्ये दक्षिण बाजूला ओढा आहे. हे म्हणणे खरे नाही की घरच्या जमीनीमध्ये दक्षिणेकडे दशरथ व उत्तरेकडे आमचा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की दळे चांदीचे शेत येथे आमची जमीन नाही. हे म्हणणे खरे आहे की खंडोबाचा माळ व आढावाची पट्टी यामध्ये दशरथची कब्जे वहिवाट आहे. हे म्हणणे खरे आहे की परडयाजवळ आमचे शेत आहे. ते शेत ३१ गुंठयाचे आहे. हे म्हणणे खरे नाही की परडयाजवळच्या शेतात पूर्वेकडे दशरथची व पश्चिमेस आमची वहिवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की सन १९७२ मध्ये दशरथ व गौतम यांनी मिळकतींचे वाटप करुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की त्याप्रमाणे दिनांक ०५/१०/१९७२ रोजी वाटपयादी तयार केली. हे म्हणणे खरे नाही की मुळ वाटपयादी माझ्या व दशरथच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की ती मुळ वाटप यादी हजर करा अशी दशरथला नोटीस प्रतिवादींनी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की त्याची झेरॉक्स दशरथ व माझ्या वडीलांनी प्रतिवादी यांना दिली होती.

**प्रतिवादी वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

कोरेगाव | **(ए. ए. पाचरणे)**
दि. ०३/१२/२०२४ | सह दिवाणी न्यायाधीश कोरेगाव.